# के. के. वाघतर्फे रविवारी नेत्रतपासणी शिबिर

**नाशिक : प्रतिनिधी** के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक, के. के. वाघ फाउंडेशन, बाळासाहेब वाघ वेल्फेअर फाउंडेशन, स्माईल व स्पिनॅच यांच्या संयुक्त विद्यमाने बाळासाहेब (भाऊ) देवराम वाघ यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ निफाड तालुक्यात मोफत नेत्रतपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. काकासाहेबनगर, भाऊसाहेबनगर, पिंपळस, चांदोरी आणि वऱ्हेदारणा येथे पार पडणार आहे. पहिल्या टप्प्यात काकासाहेबनगर येथे नेत्रतपासणी शिबिर आयोजित केले गेले आहे. त्यानुसार सावरगाव, कुंभारी, रानवड, वावी व सारोळे(खु.) या गावांतील नागरिकांसाठी रविवार, दिनांक २३ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेदरम्यान के. के. वाघ इंग्लिश स्कूल, काकासाहेबनगर येथे संपन्न होणार आहे. तरी नागरिकांनी नेत्रतपासणीसाठी आधार कार्ड घेऊन येणे अनिवार्य आहे. तसेच नावनोंदणीसाठी संदिप शिंदे (९०२११९१९४६७) व ज्ञानेश्वर गवळी (९३५६७९७८९९) यांच्याशी संपर्क साधावा. नागरिकांनी लाभ घ्यावा, असे संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ, जनसंपर्क संचालक मा. अजिंक्य बाळासाहेब वाघ व सचिव प्रा. के. एस. बंदी यांनी केले आहे.

gavkari 22-12-2025